


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २४ मार्च २०२४

किंमत ४ ₹

**उद्या अंक नाही**

आज रविवार, दि. २४ मार्च २०२४ रोजी होळीनिमित्त ‘कृषीवल’ कार्यालयास सुट्टी आहे. त्यामुळे सोमवार, दि. २५ मार्च २०२४ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक व हितचिंतकांनी दखल घ्यावी, ही विनंती.

\- मुख्य संपादक



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२४ मार्च

१) श्री.प्रभाकर विनायक दांडेकर पोयनाड,अलिबाग, २४-०३-१९४०
२)श्रीम.सुनिता सुधाकर पतंगे चेंढरे, अलिबाग, २४-०३-१९५३
श्रीम.आदिती मधुकर वैद्य अलिबाग, २४-०३-१९४१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# प्रकल्पाला जमीन देणार नाही

## ■ शेतकऱ्यांचा ठाम निर्धार; एमएमआरडीएविरोधात नोंदविल्या हरकती

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

एमएमआरडीएच्या माध्यमातून उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांसाठी नवनगर योजना नियोजित केली असून, या तीन तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सरकार काढून घेऊन त्या भांडवलदारांच्या घशात घालणार आहे. त्यामुळे इथला शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे. याला विरोध दर्शविण्यासाठी येथील स्थानिक शेतकरी जागा झाला असून, आमच्या जमिनी प्रकल्पासाठी देणारच नाही, असा ठाम निर्धार चिरनेर येथे गुरुवारी झालेल्या बैठकीत उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी घेतला आहे. दरम्यान, दि. ४ मार्चच्या सूचनेला हरकत दर्शवण्यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडे लेखी अर्जांच्या माध्यमातून हरकती नोंदविल्या आहेत.

एमएमआरडीएच्या प्रकल्पामुळे इथला शेतकरी संपूर्ण उद्ध्वस्त होणार आहे. शिवाय, आमच्या जमिनी पूर्वापार वाडवडिलांनी राखून ठेवल्या आहेत. ते आमचे जगण्याचे साधन आहे. आणि तेच साधन सरकार काढून घेणार असल्याने शेतकरी भयभीत झाला आहे. या जमिनी गेल्यानंतर आम्ही खाणार काय? अटल सेतूमुळे मुंबईच्या सान्निध्यात १२४ गावे आली आहेत. त्यामुळे येथील जमिनींची किंमत मुंबईतल्या जमिनीइतकी आहे. याची जाणीव सरकारला आहे. मात्र, त्याचा फायदा मूळ शेतकऱ्यांना मिळू नये आणि तो अप्रत्यक्षरित्या भांडवलदारांना मिळावा अशा प्रकारचे प्रयोजन सरकारचे दिसून येत आहे. तर, विकास योजनेतील उक्त क्षेत्र सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नवनगर म्हणून निर्देशित करणे आणि त्यानुसार फेरबदल करणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. परंतु, सदर नवनगर संकल्पना सार्वजनिक हिताची होऊ शकत नाही. याशिवाय शासनाने नवनगर विकास प्राधिकरण म्हणून एमएमआरडीएला नियुक्त करताना, एमएमआरडीएने मुंबई पारबंदर जोड रस्ता बनविण्यासाठी खर्च केला आहे. या खर्चाची वसुली करण्यासाठी १२४ गावांतील सर्व जमिनी जबरदस्तीने घेणे गरजेचे असे म्हटले आहे. हे जमीन मालक शेतकऱ्यांना कदापि मान्य होणार नाही.

राज्य सरकार आमचे उदरनिर्वाहाचे साधन असणारी जमीन हडप करून ती भांडवलदारांच्या घशात घालण्याचा डाव आखत आहे. त्यामुळे या प्रकल्पास जमीन देण्यास आमची हरकत आहे, असे शेतकऱ्यांनी म्हटले आहे. विकास योजना आमच्या विभागात राबविण्यास विरोध दर्शविला आहे. महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई, उरण, पनवेलमधील ९५ गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी हस्तांतरित करून जमिनीचा विकास करण्याची जबाबदारी सिडकोवर सोपवली होती. परंतु, सिडकोने आजतागायत भूसंपादित केलेल्या जमिनीचा विकसित केलेला मूळ भूखंड दिलेला नाही. याशिवाय या जागेचा संपूर्ण विकास करण्यास सिडको असमर्थ ठरली आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या भागातील मूळ गावठाणांचा ५० वर्षांनंतरही गावठाण विस्तार न झाल्याने मूळ गावठाणाबाहेरील घरे व इतर वाणिज्यीक बांधकामे अद्याप नियमित केलेली नाहीत. त्यामुळे ही बांधकामे अनधिकृत ठरवून त्यावर सिडकोकडून तोडक कारवाई केली जात आहे. येथील सिडको प्रकल्पग्रस्त आणि नवी मुंबई विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्त आजही त्यांच्या न्याय्य हक्कापासून वंचित आहेत. प्रकल्पग्रस्तांवर अशा प्रकारचे अन्याय होत असतील, तर येथील शेतकऱ्यांचा पूर्वानुभव पाहता आमच्या जमिनीवर सरकारने लादलेल्या कोणत्या विकास योजनेस आमचा सक्त विरोध असणार आहे. असे प्रकल्प भांडवलदारांच्या फायद्यासाठी असून, शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा सरकारचा डाव असून, तो आम्ही कोणत्याही परिस्थिती सफल होऊ देणार नाही, असा ठाम निर्धार चिरनेर येथे झालेल्या बैठकीत घेतला आहे.

सदर विकास योजना किंवा प्रकल्प आमच्या विभागात राबविण्यास आमचा कायम विरोध असून, सदर नवनगर प्रकल्प रद्द करण्यात यावा तसेच आम्हाला सुनावणीची संधी मिळावी यासाठीही मागणी करण्यात आली आहे. या बैठकीला उरण तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलिबाग-वावे एसटी बस सुरु

## ■ माजी आ. पंडित पाटील यांच्या प्रयत्नांना यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-वावे मार्गावरील प्रवाशांसह बामणगाव शाळेतील विद्यार्थ्यांची एसटीअभावी गैरसोय झाली होती. माजी आ. पंडित पाटील यांच्या प्रयत्नाने अलिबाग-वावे एसटी बससेवा सुरु करण्यात आली आहे. त्यांच्या मागणीची दखल घेत एसटी महामंडळ रायगड विभागाने कार्यवाही करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे प्रवाशांसह विद्यार्थ्यांकडून पंडित पाटील यांचे आभार व्यक्त केले जात आहेत.



अलिबाग-रोहा मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड आहे. अलिबागमध्ये मोठ्या संख्येने नोकरी-व्यवसायासह शिक्षणासाठी विद्यार्थी येतात. अलिबाग व रोहा आगारातून एसटी बसेस आहेत. मात्र, अलिबाग-वावे मार्गावरील बामणगाव, उसर, खानाव, घोटवडे, कावीर, सहाण, सहाणगोठी आदी गावांतील शेकडो विद्यार्थी व प्रवाशांची एसटीअभावी मोठी गैरसोय होत आहे. एसटी पास काढूनदेखील बामणगाव शाळेतील विद्यार्थ्यांना त्याचा काहीच उपयोग होत नाही. त्यामुळे त्यांची मोठी आर्थिक हानी होत आहे. अनेक वेळा खासगी वाहनांचा आधार घेत या मार्गावरील प्रवासी व विद्यार्थ्यांना प्रवास करावा लागत आहे. ही बाब पंडित पाटील यांच्या निदर्शनास आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ यासाठी त्यांनी सोमवार ते शुक्रवार या कालावधीत अलिबाग-वावे एसटी बस सुरू करावी, अशी मागणी एसटी महामंडळ रायगड विभाग नियंत्रक यांच्याकडे केली होती. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास वावे-अलिबाग व सायंकाळी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास अलिबाग-वावे एसटी बस सुरु करावी, असे निवेदनाद्वारे त्यांनी सांगितले होते. या मागणीची तात्काळ दखल घेत एसटी बस सुरु करण्यात आली आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑपरेशन ऑलआऊट

**पनवेल :** तालुका पोलिसांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यक्षेत्रात ऑलआऊट ऑपरेशन मोहीम पोलीस उपायुक्त परिमंडळ २ चे विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभागचे अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध परिसरात जाऊन राबविली. यावेळी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यात आली.

त्यामध्ये प्रामुख्याने अंमली पदार्थ विरूद्ध कारवाई करताना ०२ आरोपी अटक करण्यात आले असून, त्यापैकी एका महिला आरोपीचे घरझडतीमध्ये ४८,८४०/- रू. किमतीचा २.३९६ कि.ग्रॅ कोरडा गांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणारे दोन इसमांवर कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भारतीय हत्यार कायदा ३(२५) प्रमाणे एक गावठी पिस्तुल व ०५ जिवंत राऊंड जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे. तसेच भारतीय हत्यार कायदा क -४ (२५) प्रमाणे एक लोखंडी धारदार घातक शस्त्र जप्त करण्यात आले आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम ६५(ई) अन्वये एकूण ११ गुन्हे दाखल करून देशी, विदेशी व हातभट्टी दारू (विनापरवाना विक्री) जप्त करण्यात आली आहे. परिसरातील हिस्ट्रीशिटर, गुंडा चेकिंग करण्यात आली यात ०३ जण मिळून आले. पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये ०२ ठिकाणी नाकाबंदी करून कारवाई करण्यात आली होती.

## एसटी बस-कारचा अपघात



**अलिबाग :** अलिबाग-पेण मार्गावर शनिवारी दुपारी एसटी बस व कारचा अपघात झाला. या अपघातामध्ये कारसह बसचे नुकसान झाले. सुदैवाने मोठा अपघात टळला. ओव्हरटेक करताना हा अपघात झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पनवेलहून विना थांबा एसटी बस अलिबाग स्थानकाकडे निघाली. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास शहरातील मेघा चित्रमंदिरजवळ आल्यावर रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका कारचा आणि बसचा किरकोळ अपघात झाला. या अपघातामध्ये कारचे नुकसान झाले. बससह कारमधील प्रवासी सुखरूप असून, त्यांना कोणतीही दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले आहे. ओव्हरटेक करताना हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे.

## कारच्या धडकेने एक जखमी

**पनवेल :** कारने मोटारसायकलला धडक दिल्याने कमलेश चंद्रकांत मोझर (३३, रा. घणसोली) जखमी झाला आहेत. याप्रकरणी कारचालक तुळशीराम मुकादम (रा. पनवेल) यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कमलेश हा त्याच्या मोटारसायकलने पनवेल येथे आला. तेथून परत जाताना पनवेल गार्डन हॉटेल सिग्नलजवळ तो थांबला होता. सिग्नल मिळाल्यावर तो पुढे जात असताना बेलापूरकडून येणाऱ्या कार चालकाने त्याच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात कमलेश मोजर जखमी झाला.

# भगतसिंग यांचे कार्य प्रेरणादायी

## आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन

**। पेण । प्रतिनिधी ।**

शहीद भगतसिंग यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारी लढा दिला आहे. त्यांचे बलिदान देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान ठरले आहे. भगतसिंग यांच्यासारख्या तरुण क्रांतिकारकांचे मानवता वादासाठी समाजवादावर आधारित क्रांतिकारी जीवन कार्य तसेच त्यांच्या लेखनाची भारत देशाला गरज आहे. त्यांचे कार्य तरुणांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले.

शहीद भगतसिंग यांच्या स्मरणार्थ शनिवारी (दि. २३) मार्च रोजी भारतीय महिला फेडरेशन द्वारा आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांच्यावतीने शहीद दिवस हा कार्यक्रम पेणमधील महात्मा गांधी वाचनालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी जयंत पाटील बोलत होते.



यावेळी आ. जयंत पाटील म्हणाले, भारतीय महिला फेडरेशनच्या रायगड जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्त्या मोहिनी गोरे यांच्या प्रयत्नातून पेणमधील घरकाम महिला कामगार यांची संघटना स्थापन करण्यात आली आहे. त्यांनी प्रथमच भारतीय महिला फेडरेशनच्या महाराष्ट्र राज्याच्या सचिव लता भिसे सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शासकीय योजना, कामाचे तास, महिन्यातून दोन पगारी सुट्ट्या तसेच पेन्शन योजना यासंदर्भात शासन दरबारी आपला पाठपुरावा सुरू आहे. मोहिनी गोरे यांचे हे काम कौतुकास्पद असून, त्यांनी जिल्हा पातळीवर अशी संघटना बांधून महिला कामगारांना जो न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला आम्ही संपूर्ण सहकार्य करू, असे आश्वासन आ. पाटील यांनी दिले.

कुन्नूरची राणी चेन्नम्मा यांनी ब्रिटिशांविरुद्ध सर्वप्रथम लढा दिला. या प्रेरणादायी लढ्याला आज दोनशे वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने जाहीरनामा प्रकाशन भारतीय महिला फेडरेशनच्या विचार मंचावर आ. जयंत पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या वेळी कॉ. जयवंत पाटील, कॉ. जोहेकर, अतुल म्हात्रे, सुजाता पाटील, महादेव दिवेकर, राजू कोरडे उपस्थित होते.

# ॲडमिरल रामदास यांच्या आठवणींना उजाळा

**। वाघ्रण । वार्ताहर ।**





भारतीय नौदल प्रमुख ॲडमिरल दिवंगत लक्ष्मीनारायण रामदास यांची शोकसभा शुक्रवार, दि. २२ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता अलिबाग तालुक्यातील भायमळा येथील त्यांच्या फार्म हाऊसवर आयोजित करण्यात आली होती. या शोकसभेला तालुक्यातून अनेक विविध क्षेत्रातील संघटनांचे पदाधिकारी व चाहते उपस्थित होते.

बालरोग तज्ज्ञ डॉ. राजीव धामणकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी एल रामदास यांच्या १९५३ ते १९९३ या काळात त्यांनी केलेल्या प्रशंसनीय कामगिरीचा आढावा घेतला. सेझविरोधात स्थापन केलेल्या बावीस गाव बचाव संघटनेचे अध्यक्ष अर्जुन काशिनाथ गावंड यांनी मनोगत व्यक्त करताना सेझविरोधात आंदोलने झाली, त्यामध्ये शेवटपर्यंत सामील झालेले आणि शेतकऱ्यांच्या बाजूने लढलेले मार्गदर्शक आणि आधार होते, असे मत व्यक्त केले. त्यांच्यानंतर गौतम भिगार्डे (धोकवडे), सेझ आंदोलनातील सल्लागार ॲड. प्रमोद पाटील (वाघ्रण), ॲड. आदिती वैद्य (केतकीचा मळा), रविकीरण पाटील (वाघ्रण), गोपाळ पाटील (मांडवखार), प्रयास हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. रवींद्र म्हात्रे आदींनी मनोगत व्यक्त केले.

शेवटी एल रामदास यांच्या पत्नी ललिता रामदास यांनी एल रामदास यांच्या स्वभावाबद्दल सांगताना ते योद्धा होते, शिस्तप्रिय होते, देशावर त्यांचे प्रचंड प्रेम होते, तेवढेच कुटुंबावरसुद्धा होते हे सांगताना भायमळा येथे आल्यापासून आजपर्यंत ज्यांनी सहकार्य केले, त्यांचा नामोल्लेख करताना एल. रामदास यांनी लहान शालेय मुलांच्या प्रगतीसाठी स्थापन केलेल्या प्रथम ट्रस्टचादेखील उल्लेख केला.

# विनाथांबा एसटी बसमध्ये बिघाड

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागकडून पनवेलला जाणाऱ्या विनाथांबा एसटी बसमध्ये शनिवारी दुपारी कर्नाळा येथे बिघाड झाला. दरम्यान, एक तास उलटूनही पर्यायी बसची व्यवस्था केली नसल्याने एसटी महामंडळाच्या कारभाराबाबत प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

रस्ता सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून एसटी महामंडळामार्फत वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. प्रवाशांना चांगली सेवा देण्याची प्रतिज्ञाही घेतली जाते. मात्र, 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे एसटी महामंडळाचा कारभार असल्याचे समोर आले आहे. अलिबाग आगारातून दुपारी




विनाथांबा एसटी बस पनवेलकडे निघाली. कर्नाळा अभयारण्याच्या जवळ आल्यावर अचानक बस बंद पडली. एक तास होत आला तरीही बस सुरू झाली नाही. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. ज्येष्ठ नागरिकांसह महिला, लहान मुलांना तासभर दुसऱ्या बसची वाट पाहावी लागली, त्यामुळे प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली.

## कोंडगावच्या उपसरपंचपदी यशवंत शीद बिनविरोध

**। नागोठणे । वार्ताहर ।**

कोंडगाव ग्रामपंचायतीमध्ये उपसरपंच अनंत वाघ यांनी आपला तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करून पदाचा राजीनामा दिला. यावेळी रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी सरपंच प्रणाली मढवी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच निवडणूक अधिकारी ग्रामसेवक राकेश टेमघरे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि.२२) निवडणूक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी यशवंत देवजी शीद यांचा उपसरपंचपदासाठी एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

कोंडगाव ग्रामपंचायतीच्या कार्यालयात पार पडलेल्या उपसरपंचपदाच्या निवड प्रक्रियेवेळी सरपंच प्रणाली मढवी, मावळते उपसरपंच शेकापचे ज्येष्ठ नेते अनंत वाघ, सदस्य निखिल मढवी, सदस्य कमल बुरूमकर, गोविंद हंबीर, मनाली वाघ, विठ्ठल वाघमारे, ग्रामसेवक तथा निवडणूक अधिकारी राकेश टेमगरे यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते.

# नागावमार्गे एसटी बससेवा सुरु करा

## सरपंच हर्षदा मयेकर यांची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील नागाव येथील रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. तरीदेखील एसटी बससेवा या मार्गावरून सुरु झाली नाही. त्याचा फटका या मार्गावरील प्रवाशांना बसत आहे. नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी नुकतीच अलिबाग एसटी बस आगार व्यवस्थापक यांची भेट घेऊन नागावमार्गे एसटी बससेवा पूर्ववत सुरु करावी, अशी मागणी केली. यावेळी त्यांनी स्थानक प्रमुखांकडे निवेदन दिले.



अलिबाग-रेवदंडा मार्गावरील रायवाडीमधील ४०० मीटरच्या काँक्रिटीकरणाचे काम गेल्या महिन्याभरापासून सुरू होते. त्यामुळे सहाण बायपासमार्गे वाहतूक वळविण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेले हे काम पूर्ण होऊन अनेक दिवस उलटून गेले आहेत. तरीदेखील हा रस्ता एसटी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला नाही. नागाव ग्रामपंचायत हद्दीतील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी व ग्रामस्थ कामानिमित्त एसटी बसच्या माध्यमातून प्रवास करतात. परंतु, रस्त्याचे काम सुरु असल्याने पाल्हे बायपास रस्त्याने वाहतूक वळवण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी व ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. प्रलंबित असलेले रायवाडी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

तरीदेखील एसटी बससेवा सुरु करण्यात आली नाही. एसटी बस वाहतुकीसाठी नागावमार्गे रस्ता खुला करण्यात यावा, अशी मागणी हर्षदा मयेकर व निखील मयेकर यांनी केली आहे. विद्यार्थी व ग्रामस्थांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी नागावमार्गे बसेस तातडीने सुरु करण्याचे निर्देश देण्यात यावेत, असे हर्षदा मयेकर यांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले.

# रस्त्याच्या रुंदीकरणात वनविभागाची आडकाठी



## कर्जत-नेरळ-शेलू राज्यमार्गावरील जमिनीचा प्रश्न कायम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत-नेरळ-शेलू या कर्जत तालुका हद्दीमधील रस्त्याचे काँक्रिटकरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे. मागील दहा वर्षांपूर्वी रस्ता दुपदरी करण्याचे काम सुरु आहे. त्या रस्त्यावर चार ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यामध्ये वन विभागाची जमीन आहे. त्या जमिनीचा प्रश्न आजही निकाली निघाला नसल्याने पुन्हा एकदा वाहनचालक यांना दुपदरी रस्त्यात मध्येच एकपदरी अशी स्थिती निर्माण झाली आहे.

खोपोली-कर्जत-कल्याण-शहापूर या राज्यमार्ग रस्त्यातील कर्जत तालुका हद्दीमधील २१ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण सार्वजनिक बांधकाम विभाग करीत आहे. महाराष्ट्र शासनाच्या हायब्रीड तत्त्वावर या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु असून, सध्या कर्जतपासून वडवलीपर्यंत या रस्त्यावर काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. आता त्या रस्त्याचे काम घेणाऱ्या ठेकेदाराने कर्जतकडे जाणाऱ्या रस्त्यावर काँक्रिटीकरणाचे काम सुरु केले आहे. मात्र, कर्जत तालुका हद्दीत तब्बल पाच ठिकाणी रस्त्याच्या रुंदीकरणात वन विभागाची जमीन आडकाठी ठरत आहे. कर्जतपासून पुढे शेलूकडे रायगड जिल्हा हद्दीकडे येताना किरवली, वांजळे-सावरगाव, नेरळ हुतात्मा चौक आणि शेलू या ठिकाणी वन जमीन असल्याने तेथे रस्ता हा वन विभागाच्या जागेत करता येत नाही. वन विभागाने शेलू येथे रस्त्याचे खोदकाम केले जात असताना ते काम बंद पडले होते. त्या गोष्टीला दहा वर्षे पूर्ण होऊनदेखील वन विभागाच्या जागेच्या अडचणी त्या रस्त्यांच्या कामांचे ठेके घेणारे मोठे ठेकेदार यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या नावे करुन घेतली नाही. त्यामुळे आजही त्या ठिकाणी रस्ता निमूळताच राहिला असून, २० वर्षांपूर्वी असलेला रस्त्याचा भाग तेथे असल्याने वाहनचालक यांना त्या भागातून वाहने पुढे नेताना धोकादायक स्थितीतून पुढे जावे लागते. दरम्यान, वन विभागाने अडवलेल्या रस्त्यावर डांबरीकरण करून अखंड रस्ता तयार करून देण्यात यावा, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे.

# 'शारलोट' गाळमुक्त होणार का?

*। माथेरान, वार्ताहर*

*माथेरानमध्ये येथील अतिमहत्त्वाच्या समजला जाणारा शारलोट तलाव जो माथेरानकरांची तहान भागवतो, तो यावर्षी तरी गाळमुक्त होणार का, असा संतप्त सवाल स्थानिकांमधून विचारला जात आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असून, शारलोट तलावात गाळ जास्त आणि पाणी कमी अशी स्थिती आहे. नेरळ-कुंभे येथून होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे माथेरानचा पाणीपुरवठा सुरळीत आहे.*



*माथेरानमध्ये पिण्याचे पाणी ब्रिटिशकालीन शारलोट तलावात साठविले जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत या तलावाची देखभाल दुरुस्ती करत पूर्ण माथेरानला या तलावातील पाणी फिल्टर करून पिण्यासाठी वापरात आणतात. येथे येणारे पर्यटक व नागरिक या पाण्याचा पिण्यासाठी उपयोग करतात. पण, गेली नऊ वर्षे या तलावाची सफाई केली गेली नसल्याने गाळाचे प्रमाण वाढले आहे. पावसाळ्यात जमिनीची धूप होऊन तीन दिशांचे पाणी या तलावात येते, त्यामुळे या तलावात गाळ मोठ्या प्रमाणात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नऊ वर्षे या तलावाकडे विशेष लक्ष दिले नाही. २०१५ मध्ये नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने श्रीसदस्यांमार्फत या तलावाची मोफत सफाई करून फार मोठ्या प्रमाणात गाळ काढण्यात आला होता. तेव्हापासून माथेरानला स्वच्छ पाणी मिळत आहे,*

> *शारलोट तलाव हा माथेरानकरांचे तहान भागविणारा तलाव आहे. पाण्याची पातळी वाढवण्यासाठी एमजेपीने आत्तापासूनच नियोजन केले पाहिजे. यावर्षी जानेवारीपासून काही विभागात मंगळवार तर काही विभागात बुधवारी पाणीकपात करण्यात येत आहे. जर मागील वर्षी शारलोट तलाव गाळमुक्त केला असता, तर ही वेळ आली नसती. तेव्हा याची पुनरावृत्ती नको म्हणून आत्तापासूनच याचे नियोजन सुरू करावे.*
>
> *- दिपक जाधव, माजी नगरसेवक*

### *मागील वर्षांची पुनरावृत्ती नको*

*मागील वर्षी शारलोट तलाव गाळमुक्त करण्यासाठी नगरपालिका आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी एकत्र येत तयारी सुरू केली. पालिकेकडून पैशाची व्यवस्था केली. पण, तलावातील पाणी सोडण्यावेळी पाणी जाणाऱ्या मार्गातील गावे येणाऱ्या लोकांना माहिती दिली नसल्याने हे काम थांबविण्यात आले. याची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये यासाठी या कामाचे नियोजन एप्रिल महिन्यापासूनच करावे, अशी स्थानिकांची मागणी आहे.*

*पण आता नेरळ कुंभे येथून पाणीपुरवठा सुरळीत असल्याने शारलोट तलावाकडे अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.*

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक २८८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, रविवार, दि. २४ मार्च २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

# तटकरेंचा दिल्लीश्वरांना मुजरा

## रायगडच्या जागेचा तिढा सुटता सुटेना

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
**इंडिया आघाडीत असताना सत्तेचे केंद्रबिंदू महाराष्ट्रात शरद पवार हे होते. महायुतीत सामील झाल्यावर ते दिल्ली झाले आहे. महायुतीतून सुनील तटकरे यांची उमेदवारी अद्याप घोषित करण्यात आलेली नाही. भाजपा या जागेवर दावा सांगत असल्याने तटकरेंची चांगलीच अडचण झाली आहे. जागेचा तिढा सोडवण्यासाठी आणि छोट्या-छोट्या गोष्टींसाठी त्यांना सातत्याने दिल्ली दरबारी झुकावे लागत असल्याचे चित्र आहे.**



महायुतीमध्ये रायगड लोकसभा मतदारसंघावर दावे-प्रतिदावे केले जात आहेत. अशातच गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेसची (अजित पवार गट) अलिबाग येथे प्रमुख नेते आणि पदाधिकारी यांची बैठक पार पडणार होती. मात्र, माजी खासदार सुनील तटकरे यांना स्वतः च्या उमेदवारीसह पक्षातील अन्य इच्छुकांसाठी अचानक दिल्ली दरबारी मुजरा करण्यासाठी जावे लागल्याने बैठक रद्द करावी

पान ४ वर

> पूर्वी सत्तेचे केंद्रबिंदू महाराष्ट्रात शरद पवार हे होते. त्यांच्या पाठीत खंजीर खुपसून आता दिल्ली दरबारी मुजरा करावा लागत आहे, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. इंडिया आघाडीत असताना त्यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला स्वाभिमान होता. आता तो गुंडाळून ठेवावा लागला आहे. इंडिया आघाडीने गीतेंच्या रुपाने स्वच्छ चारित्र्याचा उमेदवार दिल्याने विजय आमचाच आहे.
>
> – आमिर खानजादा,
> जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार)

### अलिबागची बैठक करावी लागली रद्द

सुनील तटकरे यांनी गुरुवारी अलिबाग-खडताळ पूल येथील हॉरीझोन सभागृहात राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलवली होती. त्यामुळे तटकरे यांची उमेदवारी पक्की झाले असे सर्वांना वाटल्याने पदाधिकारीदेखील खुश होते. मात्र, आयत्या वेळी तटकरे यांनी सदरची बैठक रद्द करण्यास सांगितले. त्यामुळे बैठकीचे नियोजन पाहणारे पदाधिकारी चक्रावून गेले. नेमके काय घडले, हे त्यांना कळले नाही. साहेब तातडीने दिल्लीला गेले आहेत, एवढाच मेसेज संबंधित पदाधिकाऱ्यांना आला. त्यामुळे जेवणाची केलेली तयारी, मंडप, सजावट असे सर्वच व्यर्थ गेले.

## ‘वंचित’चं ठरलं!

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**
महाविकास आघाडीची वंचित बहुजन आघाडीसोबत बोलणी सुरुच आहे. अशातच ‘वंचित’चे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी कोल्हापूरमध्ये शनिवारी (दि. २३) पत्रकार परिषद घेत शाहू छत्रपतींना पाठिंबा जाहीर केला आहे. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, काँग्रेसने ज्या सात जागा जाहीर केल्या आहेत, त्या त्यांनी आम्हाला सांगाव्यात. आम्ही त्यांना इतर जागांवर पाठिंबा देणार नाही. येत्या २६ तारखेला आम्ही आमची भूमिका जाहीर करणार आहोत.

# जिल्ह्यात उभारणार पाच हजार होळ्या

## ३२ ठिकाणी दोन दिवस काढणार मिरवणुका

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**
रायगड जिल्ह्यामध्ये २४ मार्च रोजी होळीनिमित्त चार हजार ९८५ ठिकाणी होळ्या उभारल्या जाणार आहेत. त्यांचे विधीवत पुजन करून दहन केले जाणार आहे. होळीनिमित्त जिल्ह्यात ३२ ठिकाणी मिरवणुका काढल्या जाणार आहेत. त्याअनुषंगाने रायगड पोलीस दलामार्फत कडेकोट बंदोबस्त ठेवला जाणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



रायगड जिल्ह्यामध्ये होलिकोत्सव जल्लोषात साजरा केला जातो. आबालवृद्धांपासून सर्वच मंडळी या उत्सवात सहभागी होतात. पारंपरिक पेहराव करून होळीला पुरणाची पोळी नैवेद्य देऊन पूजा केली जाते. त्यानंतर रात्री होळीचे दहन केले जाते. गेल्या अनेक वर्षांपासूनची ही परंपरा आजही जपली जाते.

ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी होळ्या उभारल्या जातात. वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम घेऊन हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. रायगड जिल्ह्यात चार हजार ९८५ ठिकाणी

पान ४ वर







# दिव्यांग मतदारांसाठी 'सक्षम'

। खास प्रतिनिधी । रायगड ।

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींसाठी आणि ८५ वर्षे पूर्ण झालेल्या वयोवृद्धांना मतदान प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टिने सुरू केलेल्या 'सक्षम' ॲपच्या माध्यमातून अधिकच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. रायगड लोकसभा मतदार संघात एकूण आठ हजार ४६ दिव्यांग मतदार आहेत. यापैकी दोन हजार ९३३ महिला, तर पाच हजार १३३ पुरुष मतदार आहेत.**

या 'सक्षम' ॲपवर दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग म्हणून नोंदणी करण्याची, नवीन मतदार नोंदणीसाठी, मत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित करणे, मतदान केंद्र बदलाची व व्हील चेअरची विनंती करता येत असून मतदार यादीत नाव शोधण्याची, मतदान केंद्र जाणून घेणे, तक्रारी नोंदविणे, मतदान अधिकारी शोधणे, बूथ लोकेटर स्थिती तपासणे आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सक्षम ॲपवर अंधत्व, अल्प दृष्टी, बहिरेपणा, कमी श्रवणशक्ती, शारीरिक व्यंग, मानसिक आजार (मानसिक सामाजिक अपंगत्व), कुष्ठरोग, बौद्धिक अपंगत्व, सेरेब्रल पाल्सी, बौनेत्व, मस्कुलर डिस्ट्रोफी, ॲसिड हल्ल्यातील बळी, भाषण आणि भाषेतील अपंगत्व, विशिष्ट शिकण्याची अक्षमता, ऑटिझम, स्पेक्ट्रम विकार, मल्टिपल स्क्लेरोसिस आणि पार्किन्सन रोगासह क्रॉनिक न्यूरोलॉजिकल विकार, हिमोफिलिया, थैलेसेमिया आणि सिकल सेल ॲनिमियासह रक्त विकार आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्ती नोंदणी करू शकतात. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यात दिव्यांग व्यक्तींसाठी सर्व ठिकाणी मतदान केंद्र तळमजल्यावर असतील. तेथे पिण्याचे पाणी, प्रतीक्षा शेड, वैद्यकीय किट, सुलभ शौचालय, मतदान केंद्रांवर पुरेशी विद्युत रोषणाई, केंद्रांवर रॅम्प आणि व्हीलचेअरची सोय, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्याने प्रवेश सुविधा, स्वतंत्र रांगेची सुविधा, मानक चिन्हे आणि साइन बोर्ड असतील.

मतदान केंद्रावर स्वयंसेवक सहाय्य उपलब्ध असणार आहे. अंध आणि अशक्त मतदारांच्या मतांची नोंद करण्यासाठी ईव्हीएम वर ब्रेल लिपीची व मदतनीसाची सुविधादेखील उपलब्ध असणार आहे.

## धूलिवंदनच्या दिवशी मेट्रो बंद

। पनवेल । वार्ताहर ।

सिडकोच्या मेट्रो मार्ग क्रमांक १ बेलापूर ते पेणधर वरील मेट्रो सेवा सोमवारी (दि.२५) होळी (धूलिवंदन) निमित्त सकाळच्या वेळेत बंद राहणार आहे. दुपारनंतर मेट्रो सेवा पुन्हा सुरू होणार आहे. या दिवशी दुपारी ०२.०० ते रात्री १०.०० या वेळेत मेट्रो सेवा दर १५ मिनिटांनी उपलब्ध असणार असल्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे. तरी या मार्गावरील प्रवाशांनी याची नोंद घेऊन त्याप्रमाणे आपल्या प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.

# विद्यालयातील मुलींची आरोग्य तपासणी



। कोर्लई । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील नांदगाव-यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील मुलींची नुकतीच आरोग्य तपासणी करण्यात आली.

आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जस्मीन मनसे, काशिनाथ कुलकर्णी, आरोग्य पथक नांदगावच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रेया मंगेश पाटील, आरोग्य सहाय्यक गणेश शिंदे, आरोग्य सेवक राजेंद्र चुनेकर, सुभाष हुरदुके, प्रणय धसाडे, आरोग्य सेविका प्रज्ञा चौलकर, लॅब टेक्निशियन साक्षी गुरव, स्नेहा वीरकर, सुमित वाडकर, मळेकर आदींनी मुलींची एच.बी. हिमोग्लोबीन व अन्य तपासण्या केल्या.

यावेळी मुलींनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे असून, व्यायामाचे महत्त्व, फास्ट फूडचे सेवन न करणे, पाळीच्या वेळी घ्यावयाची स्वच्छता व काळजी, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर करणे आदींबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या समस्यांबाबत डॉक्टरांना न लाजता, न घाबरता सांगून त्यांची सोडवणूक करून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका ए.यू. खोत यांनी सर्वांचे आभार मानले.

## पाठ्यपुस्तक निर्मितीचे जाहीर निवेदन

। पुणे । प्रतिनिधी ।

पाठ्यपुस्तक मंडळाकडे नोंदणीकृत झालेल्या सर्व मुद्रक बांधणीकार व पुस्तक विक्रेते तसेच शैक्षणिक संस्था इत्यादींना कळविण्यात येते की, बुधवारी दि.२७ ते ३१ या कालावधीत पुस्तके व कागदाची वार्षिक प्रत्यक्ष साठा मोजणी होणार असल्याने या कालावधीत मंडळाची विभागीय भांडारे गोरेगांव, पुणे, नागपूर, औरंगाबाद, लातूर, नाशिक, कोल्हापूर, पनवेल व अमरावती येथील सर्व व्यवहार (आवक-जावक, विक्री इत्यादी) बंद राहतील. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घेण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# शंकासुरांची सलामी पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी

। तळा । वार्ताहर ।



रोजगारासाठी शहरात स्थलांतर केलेल्या नागरिकांची पाऊले आपसूकच कोकणातील आपल्या गावाकडे वळतात. यामुळे शिमगोत्सवात कोकणात दोन दिवस आधीपासूनच नागरिकांची गर्दी पहायला मिळते. तळा बाजारपेठेत धवचोळीला शंकासुरांची सलामी पाहण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी उसळली. होळीच्या आदल्या दिवशी तळा बाजारपेठेत धवचोळ साजरी केली जाते. या धवचोळीला खेड्यापाड्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. यावेळी प्रत्येक दुकानासमोर गावागावातील तमाशा सादर करण्यात आला.तसेच धवचोळीचे मुख्य आकर्षण असलेल्या शंकासुरांची सलामी पाहण्यासाठी लहान मुलांसह तरुण व ज्येष्ठ मंडळीदेखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहराची ग्रामदेवता चंडिका देवीचे स्थान तळेगाव येथील कोंडीजवल असल्याने दरवर्षी तळेगाव चा शंकासुर जोगवाडीच्या शंकासुरसच्या भेटीसाठी येतो. तसेच या दोघांची सलामी देण्याची प्रथा आजही कायम आहे.

## महेंद्र घरत आयटीएफच्या उपाध्यक्षपदी

। उरण । वार्ताहर ।



एनएमजीकेएस संघटनेचे अध्यक्ष, राष्ट्रीय इंटकचे चिटणीस, कामगार नेते महेंद्र घरत यांची इंटरनॅशनल ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन लंडन (आयटीएफ) या जागतिक संघाच्या उपाध्यक्षपदी फेरनिवड झाली आहे. दि. २१ मार्च रोजी आयटीएफ लंडन कार्यालयात झालेल्या निवडणुकीत ही निवड करण्यात आली. आगरी कोळी समाजाचे प्रतिनिधीत्व करीत असलेल्या महेंद्र घरत याच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्यात विशेषत: पनवेल- उरण तालुक्यामध्ये जल्लोषाचे वातावरण आहे. १९८७ साली लोकनेते स्व.दि. बा. पाटील, कामगार नेते स्व. दत्ता सामंत, स्व. दत्ता पाटील, स्व. दत्तुशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माझगाव डॉकच्या कामगारांसाठी लढा उभारून त्यांना कायम करून वयाच्या विसाव्या वर्षी आपल्या कामगार क्षेत्रातील झंझावाती कारकीर्दीची सुरुवात केली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत हि खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असुन ती त्यांचे खुद्द, ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे पाले बुद्रुक, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत**

| मालकाचे नाव | गट नं | एकूण क्षेत्र हे आर | आकार रु.पै | प्रकार |
|---|---|---|---|---|
| निलेश चंद्रकांत सानप | १२७ | जिरायत ०-०३-०० | ०=१४ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे आशिल यांनी जमीनमालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहान, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन चार्ज, ॲटचमेंट अन्न, वस्त्र, निवारा ताबा, कबजा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत हि निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

दि. २४/०३/२०२४

सही /-
**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे,**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी विंग, ४था मजला.
साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, डॉ. वागळे हॉस्पीटल जवळ, रोहा,
ता. रोहा जि. रायगड ४०२१०९,
मोबा. क. ९२७२७१३९५६

---

पान ३ वरून

## तटकरेंचा दिल्लीश्वरांना मुजरा

लागल्याचे बोलले जाते. दरम्यान, शनिवारी उशिरापर्यंत महायुतीमधील जागा वाटपाचा तिढा सुटण्याची शक्यता आहे.

अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी दिल्ली दरबारी बाद'शाह'ला कधीच मुजरा केला नाही, आता मात्र महाराष्ट्रातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार यांना दिल्ली दरबारी शाहा यांना मुजरा करावा लागत आहे. त्यांच्यापुढे लोटांगण घातल्याशिवाय पदरात काहीच पडत नाही, हे आजवरच्या राजकीय प्रवासातून अधोरेखित होते.

रायगड लोकसभा मतदारसंघातून इंडिया आघाडीतून शिवसेना ठाकरे गटाचे अनंत गीते यांचे पक्के झाले आहे. गीते यांच्या नावाची घोषणा झाल्याने त्यांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. रायगडमध्ये शेकापची मोठी ताकद आहे, तसेच काँग्रेसनेही गीते यांच्यासाठी हिरवा कंदील दिला आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचे उमेदवार गीते यांच्या दंडामध्ये प्रचंड बळ आले आहे. त्यांच्या झंझावाती प्रचाराला सुरुवात झाली आहे. शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आस्वाद पाटील, महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांना एकजूट करण्यात मुसंडी मारल्याचे चित्र आहे.

दुसरकडे मात्र महायुतीचा उमेदवार कोण आहे, हे अद्याप ठरलेले नाही. तसे बघायला गेले तर, रायगड मतदारसंघावर सुनील तटकरे यांचा दावा आहे. भाजपानेदेखील ही जागा आपल्या पदारात पाडून घेण्याची तयारी केली आहे. तसे न झाल्यास धैर्यशील पाटील यांना अपक्ष उभे करुन पाठिंबा देण्याची व्यूहरचना आखल्याचीही जोरदार चर्चा आहे.

## जिल्ह्यात उभारणार पाच हजार होळ्या

होळ्या उभारल्या जाणार आहेत. काही ठिकाणी केळीचे झाड, तर काही ठिकाणी परंपरेनुसार सावरीचे झाड उभे केले जाणार आहे. त्याठिकाणी विधीवत पूजा करून हा सण साजरा केला जाणार आहे. जिल्ह्यात दोन हजार ८५४ सार्वजनिक व एक हजार १३१ खासगी होळ्या उभ्या केल्या जाणार आहेत. होळीनिमित्त १५ ठिकाणी मिरवणुका काढल्या जाणार आहेत. तर, दुसऱ्या दिवशी धुलिवंदन (रंगपंचमी) साजरा केला जाणार आहे. यावेळी रंगाची उधळण केली जाणार आहे. यानिमित्ताने जिल्ह्यातील १७८ ठिकाणी मिरवणुका काढण्यात येणार आहेत.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे. पोलीस ठाणे स्तरावर होलिकोत्सावाबरोबरच धुलिवंदनाच्या दिवशी ठिकठिकाणी पोलीस तैनात असणार आहे. जिल्ह्यात सध्या लोकसभा निवडणुकाचा हंगाम आहे. या हंगामात आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी पोलीस कटाक्षने प्रत्येकाच्या हालचालीवर लक्ष ठेवून राहणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देणयात आली आहे.

**पर्यावरणपूरक होळी साजरी करा**

होळी सणाच्या पार्श्वभूमीवर होळी जाळण्यासाठी लाकूड हवे म्हणून ठिकठिकाणी सर्रासपणे वृक्षतोड केली जाते. प्रामुख्याने सावर जातीच्या वृक्षांची अवैधपणे वृक्षतोड केली जाते. यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळून अनेक प्रकारे नैसर्गिक आपत्ती येत आहे. त्यामुळे आपले सर्वाचेच नुकसान होत आहे. होळीत अनेक ठिकाणी गोवऱ्या, लाकडे जाळली जातात. या प्रकारामुळे प्रदूषणातही भर पडते. परिणामी, पर्यावरणालाही धोका पोहोचतो. धार्मिक महत्त्व असल्याने याबाबतही नागरिकांमध्ये प्रबोधन होण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध मंडळांनी एकत्र येऊन सार्वजनिकरित्या एकाच ठिकाणी होळी करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. या सणामध्ये कोणतीही वृक्षतोड करु नये तसेच कोणत्याही प्रकारे वन्यप्राण्याची शिकार करु नये. पर्यावरणपूरक होळी साजरी करावी, असे आवाहन उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केले आहे.

**वृक्षतोड पडणार महागात**

शहराच्या वाढत्या व्याप्तीमुळे सर्रासपणे वृक्षतोड केली जात असून, यामुळे पर्यावरणाला मात्र मोठ्या प्रमाणावर धोका पोहोचत आहे. अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्याविरोधात कारवाईचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. वृक्षतोड केल्यास प्रत्येक गुन्ह्यासाठी एक ते पाच हजार रुपये दंड, तसेच एक आठवडा ते एक वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. वरिष्ठांच्या सूचनेनुसार, होळी व धुलिवंदनच्या पार्श्वभूमीवर गावबैठका घेण्यात आल्या आहेत. पोलीस गस्तीसह ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. त्यात लोकसभा निवडणुकीचा हंगाम असल्याने हा सण, आनंदात व शांततेत साजरा करण्याबरोबरच नियमांचे पालन करीत करावा, अशा सूचना ग्रामस्थांना देण्यात आल्या आहेत. होळीमध्ये यापूर्वी झालेल्या गुन्ह्यांची माहिती घेऊन अतिउत्साही करणाऱ्यांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासदेखील आली आहे.

- श्रीकांत किरवले, सहाय्यक पोलीस निरीक्षक, रेवदंडा

### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचेतर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणेः-

माझे आशिल यांनी अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड व अलिबाग नगरपालिका परिषद हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अनंत भास्कर मोघे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सिटी सर्व्हे नं | क्षेत्र चौ.मी. | सत्ताप्रकार |
|---|---|---|
| ८०७/के | ९३.६० | - |
| ८०७ | ७०.२४ | - |

सदरहु मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिल यांस दिलेला आहे. या उपरही सदरहु मिळकतीत कोणचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वहिवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजण्यात येईल. तसेच माझे अशिल हे सदरहु मिळकती संदर्भात मिळकतीचे विद्यमान मालक श्री.अनंत भास्कर मोघे यांचेसोबत खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणाचीही, कसलीही हरकत वा तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : २३/०३/२०२४

सही/-
**(ॲड.स्वाती वेळे)**
मु.सिद्धेश अपार्टमेंट, दुसरा मजला,
ब्राम्हणआळी, पो.ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती मधुमती मारुती वरसोलकर व इतर ११ यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| आक्षी ता. अलिबाग. | ३०५ | ०-८२-०० | १८-०० |

वर नमुद केलेली मिळकती पैकी पश्चिम दिशेकडील ०-३५-०० हे. आर. जिरायत मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (०७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. २३-०३-२०२४.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक यांच्यामध्ये साठेकरार करण्यात आलेला आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु. पैसे | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| सासवणे, ता. अलिबाग, | २९८ | ०-१३-९० पो.ख. ०-००-६० एकूण क्षेत्र ०-१४-५० | ३.७५ | १)श्री.रमेश सदानंद नाखवा, २)श्री.दयाराम सदानंद नाखवा, ३)सौ.शालिनी ज्ञानेश्वर नाखवा, ४)सौ.पार्वती सुधीर नाखवा, ५) श्री.प्रितम सुधीर नाखवा, ६ श्री.प्रसेन सुधीर नाखवा, ७)श्री.केतन सुधीर नाखवा, |

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिध्द झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २३/०३/२०२४

**ॲड. अश्विनी अ. म्हात्रे**
बी.कॉम.एल.एल.बी.००१,
वैद्यबाग को. ऑप
हौ. सो. कामत आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यामान मालक मेघा महेंद्र घाटे, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे आशिल १) सौ. हर्षदा म्हात्रे २) श्री. राजु दत्तात्रेय टिवळेकर यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ३०१, क्षेत्र ०-११-०० हे.आर., पो.ख. ०-००-०० हे.आर., एकुण क्षेत्र ०-११-०० हे.आर., आकार ०.२३ रु. पैसे. या मिळकतीबाबतचे

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवासांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण: अलिबाग
दिनांक: २३/०३/२०२४

सही/-
**ॲड. तनुष्का पेडणेकर**
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ७०५७८८१६६६

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे तळवली ता. मुरुड, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक १८९ एकुण क्षेत्र १-५५-०० हे. आर, आकार १ रुपये ०० पैसे, या मिळकतीपैकी श्री अनंत काशिनाथ नरहरी, श्रीमती गंगाबाई रघुनाथ कालेकर यांचा असलेला ०-३८-०० हे आर अविभक्त हिस्सा माझे आशिलांनी मिळकतीचे सदर विद्यमान कबजेदार यांजकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा साठेकरार माझे अशिल व मिळकतीचे सदर विदयमान कबजेदार यांच्यात झालेला आहे. सदर मिळकती पैकी आमच्या असलेल्या अविभक्त हिश्याची मालकी व ताबा कबजा सदर विद्यमान कबजेदार यांचाच आहे असा भरवसा त्यांनी माझे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे अविभक्त हिश्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ''खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट '' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीची म्हणजेच आमच्या अविभक्त हिश्याचा मालकी हक्क व ताबा कबजा वरील विद्यमान कबजेदार श्री अनंत काशिनाथ नरहरी, श्रीमती गंगाबाई रघुनाथ कालेकर यांचाच आहे असे समजुन माझें अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. २३/०३/२०२४

**ॲड. श्रध्दा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी,
मु.पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- इंग्लीश बोलण्यांतील अडथळे, भिती खात्रीने घालवणार सोपा कोर्स. नंबर जपून ठेवा, गरज लागेल. ९८२२८४२८१०
- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रेस्टॉरंट मनेजर २.वेटर ३.साऊथ इंडियन नाश्ता बनवणारा कूक ४.अकाउंटंट २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५.
- इलेक्ट्रिकल (वायरींग) कामासाठी गरजू (हेल्पर) मुले हवी आहेत. चेंढरे-गोंधळपाडा ९२७०६१४०७७
- फ्लॅटस विकणे आहेत. अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६ संपर्क – ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- अलिबागमध्ये सलून कामासाठी अनुभवी मुलगा पाहिजे. मो. ९९२१०७३९६३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# शिमगाच, पण नव्या काळातला

*पूर्वी शिमग्याच्या सणाला मनातील सगळा राग बाहेर काढला जायचा. होळी पेटल्यानंतर जोराने बोंब ठोकत एकमेकांना अर्वाच्च भाषेत लाखोली वाहिली जायची. एक प्रकारे तेव्हाच्या समाजव्यवस्थेने माणसांच्या अभिव्यक्तीसाठी तयार केलेले हे व्हेंटिलेटर्स होते. आता वर्षभर शिमगा सुरू असतो. त्यातच निवडणुकांचा काळ म्हणजे एकमेकांच्या नावे बोटे मोडण्याची सुवर्णसंधीच असते. त्यामुळेच यंदा शिमगाकाळ मोठा आहे!*

**डॉ. चंद्रशेखर टिळक**

शिमगा आणि निवडणुकांच्या घोषणा यात फार मोठे साम्य असते. आपल्याकडे पहिल्यापासूनच शिमगा म्हणजे जणू अर्वाच्च भाषेत बोलण्याची संधी वा परवानगी अशा अर्थाने साजरा केला जाणारा सण मानला जातो. या अर्थाने विचार करायचा तर यंदा शिमग्याच्या पार्श्वभूमीवर लोकसभा निवडणुकांची घोषणा झाली. निवडणूक आयोगाने निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले असून निवडणुका ही तर अर्वाच्च भाषेत बोलण्याची नामी संधी असतेच! पण आजकालचे सामाजिक आणि राजकीय वातावरण बघता अर्वाच्च बोलण्यासाठी आता आपण निवडणुका वा शिमग्याची वाट बघतो असे नाही. वाढत्या अर्थव्यवस्थेत आणि त्यातही मोदी अर्थकारणाविषयी बोलले जाते की, सगळ्या महत्त्वाच्या आर्थिक घोषणा अर्थसंकल्पाबाहेर होतात. त्या धर्तीवर सांगायचे तर अर्वाच्च बोलणे, एकमेकांच्या नावाने ओरडणे हे आपल्याकडे शिमग्यालाच नव्हे तर अव्याहत सुरू असते. त्यामुळे खरे तर शिमग्याचे सार्वत्रिकीकरण हेच अलिकडच्या काळातील ठळक वैशिष्ट्य मानावे लागेल.

कोकणातील मंडळींना शिमग्याचे फार महत्त्व, उत्साह असायचा आणि आजही आहे. मुंबईत आलेला नोकरदार गणपती आणि शिमग्याला कोकणातल्या आपल्या गावी गेला नाही, असे कधीच होत नाही. पण याचे महत्त्व ओळखल्यामुळे कदाचित एक वेगळाच शिमगा सुरू झाल्यासारखी परिस्थिती आहे. ती अशी की, शिमग्याच्या अगदी आधी काही दिवस कोकणात जाणाऱ्या १८ गाड्या काही दिवसांसाठी रद्द करण्यात आल्या. आता ही शिमग्याची बोंब मारण्याची रेल्वेची नवी पद्धत आहे की काय हे समजायला मार्ग नाही. कारण त्यापूर्वीच दोन दिवस एसटीचा व्यवसाय जास्तीत जास्त वाढता राहण्यासाठी आम्ही प्रयत्न करु, असे शिंदे सरकारकडून जाहीर करण्यात आले होते. त्यामुळेच रेल्वेच बंद केल्या की लोक आपोआप एसटीने जातील आणि त्यानिमित्ताने झालेल्या वा न झालेल्या रस्त्यांची चर्चा करता येईल हा शिंदेशाहीचा शिमग्याची बोंब मारण्याचा वेगळा प्रकार तर नाही ना, याचा विचार करावा लागेल.

लोक म्हणतील, भटाचे डोके फार चालते... तसेही अलिकडे भटांच्या नावे वर्षभर शिमगा सुरूच असतो. असो. एकंदरीतच तीन मोठे नेते एकत्र आले आणि 'तीन तिघाडा, काम बिगाडा' असा शिमगा उभ्या महाराष्ट्राने पाहिला. या शिमग्यामागील कारण म्हणजे भाजपामध्ये काहीजणांना तिकिट मिळाले तर काहीजणांना डावलण्यात आले. त्यामुळे ते बोंब मारत आहेत. दुसरीकडे शिवतारे शिंदेंबद्दल बोंब मारत आहेत. अजितदादांचाही तीन की पाच जागा यावरुन शिमगा सुरू आहे. एकंदरितच सध्या शिमगा सार्वत्रिक आहे. पूर्वीच्या शिमग्याच्या पूजेमध्ये म्हणे आधी एरंडाचे झाड लावायचे. याचे मी ऐकत आलो ते असे की, टाळू खूप तापल्यास डोक्यावर एरंडाचे तेल थापले जाते. म्हणजेच एकीकडे डोक्याचा ताप कमी करण्यासाठी शिमग्याच्या आधी एरंडाचे झाड लावावे जायचे. पण आत्ताच्या राजकीय आणि सामाजिक शिमग्यामध्ये तुमच्या-माझ्या सदसद्विवेकबुद्धीचा एरंड जाणला जातो का, हे ही पाहावे लागेल. शिमगा हा एकमेव सण आहे, ज्यात सामाजिक संकेत बाजूला ठेवले जातात. शिमग्याच्या दिवशी पुरणपोळीचा नैवेद्य असला तरी रात्री होळी पेटल्यानंतर सकाळी ज्या घरातील पोळी खाल्ली तिथल्याच लोकांच्या नावे बोंब मारण्याची सवलत वा सोयही संस्कृतीने करुन ठेवली आहे. हल्ली घोषणांची पुरणपोळी दिली जाते आणि अंमलबजावणीच्या अभावाचा शिमगा मात्र नेहमीच कानी येतो. अन्यथा, कोकणात जाणारे वा गावखेड्यातले अनेक रस्ते इतकी वर्षे कशास अडले असते...!

होळी आणि धुळवड अगदी तोंडावर असताना देशात आचारसंहिता लागू झाली. मात्र ती थोडी पुढे गेली असती तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते. म्हणजेच गेली काही वर्षे गणपती, दहीहंडी, दसरा, दिवाळी आदी सणांसाठी प्रायोजक-आयोजक करणारे गट सक्रिय झाले आहेत. त्याच धर्तीवर कदाचित अनेक राजकीय गटातटांना शिमग्याचे प्रायोजकत्व घेण्याची उत्तम सोय झाली असती. निवडणुकीच्या आदल्या दिवशी लोकांमध्ये काहीबाही वाटण्यापेक्षा शिमग्याच्या निमित्ताने जागरुकतेने आणि अधिकृतपणे बरेच काही वाटता आले असते... अर्थात गमतीचे हे मुद्दे सोडले तरी या सणावारांमधील अर्थकारण आणि समाजकारण लक्षात घ्यायला हवे. सार्वत्रिकपणे साजरा होणे हे होळीचे एक वैशिष्ट आहे. इथे फरक लक्षात घेऊ या की, काळाच्या ओघात समाजनेतृत्वाने जाणीवपूर्वक सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. त्याचप्रमाणे तत्कालिन मंडळींनी दूरदर्शीपणातून शिवजयंती उत्सव सुरू केला. मात्र होळीला सार्वत्रिक स्वरुप कोणा एकाने कोणा एके काळी दिल्याची नोंद नाही. म्हणजेच पहिल्यापासूनच ही केवळ सामूहिकच नव्हे तर सामाजिक प्रक्रिया राहिली आहे. हे बघता असा अंगभूत गुण हल्लीच्या सोशल मीडियामध्ये आढळतो का, याचाही विचार करावा लागेल.

व्हॉट्स अप आणि फेसबुकचे निरनिराळे उपयोग आता चलनात आहेत. त्यामुळेच सोशल मीडिया, त्यावरील भाषा आणि प्रकटीकरण हे अलिकडच्या आधुनिक होळीचे वेगळे रुप आहे का, याचाही विचार करायला हवा. अलिकडेच अवघ्या काही मिनिटांसाठी अचानक फेसबुक बंद पडले. त्यावेळी बहुसंख्य भारतीयांनी केलेली बोंबाबोंब पाहता त्याला सार्वत्रिक शिमगा म्हटले तर चुकीचे काय, असे वाटून गेले. त्यावरुन अनेक विनोद पसरले. अंबानीच्या मुलाच्या लग्नाला आल्यामुळे फेसबुकच्या मालकाचे धंद्याकडे दुर्लक्ष झाले, या सार्वत्रिक झालेल्या



संदेशाला आधुनिक शिमगा म्हणता येईल काय! पुढे ही गंमत बराच काळ सुरू होती. मस्क महाशय इथे आले तरी त्यांची व्यवसायावर खरी निष्ठा आहे, कारण त्यांचे व्यवसायवृध्दीसंदर्भातले मेसेज येत राहिले... या आशयाचा मेसेजदेखील प्रचंड व्हायरल झाला. आता हादेखील एका वेगळ्या अर्थी आर्थिक शिमगा होता काय? ही गमतीची उदाहरणे असली तरी यातून लक्षात येते की अलिकडच्या काळात कोणताही सण किंवा कोणताही समारंभ केवळ सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा राहत नाही, कारण मुळातच आपली संस्कृती जास्तीत जास्त अर्थकारणाकडे, राजकारणाकडे वळू लागली आहे. पुर्वी समाजकारण हे अर्थकारण आणि राजकारणातून घडत असे. आता ते तसे घडत नाही.

शिमग्याच्या निमित्ताने मन मोकळे करण्याची संधी मिळते. तेव्हाच्या समाजाने लोकांना ती जाणीवपूर्वक दिली होती का, असाही विचार मनात येऊन जातो. असे असेल तर आजच्या प्रचंड मोठ्या संगणकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये याची नेमकी गरज किती, हेदेखील जाणून घ्यायला हवे. कोरोनानंतरचा काळ आता मागे पडला आहे. पण दरम्यानच्या धकाधकीच्या काळाने आपल्याला असे 'व्हेंटिलेशन'च दिलेले नाही. सध्या आपण सगळेच कार्यक्रम ऑनलाईन करतो. प्रत्यक्ष भेटणे हा प्रकार कमी झाला आहे. दुसरीकडे गेल्या तीन-चार वर्षांमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांकडे जाणाऱ्यांचे प्रमाण वाढलेले दिसत आहे.

मुख्य म्हणजे ते वय, स्थळ, लिंग, उत्पन्न निरपेक्ष आहे आणि मानसिक अशांतता हाच त्याचा मूलभूत पाया आहे. पूर्वी आपण दिवसभरात नातलग, घरातील सदस्य, कार्यालयीन सहयोगी, व्यावसायिक, सामाजिकआदी भावबंधांशी संबंधित होतो. अलिकडच्या ऑनलाईनच्या जमान्यात मात्र हे 'आऊटलेट्स' राहिलेले नाहीत. सहाजिकच मानसिक दबाबाने, हृदयविकाराच्या धक्क्याने होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण वाढत आहे. भावना व्यक्त करण्याची हक्काची फार कमी स्थाने आता उरली आहेत. म्हणूनच होळीसारख्या व्हेंटिलेशनचे काम करणाऱ्या उत्सवांचे महत्त्व नव्याने जाणून घेण्याची गरज आहे. या अर्थाने सामाजिक होळी साजरी केली तर बरेच प्रश्न सुटतील याची खात्री वाटते. **

## नवेदर बेलीत मतदारांमध्ये जनजागृती

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शाळकरी मुलांना मतदानाचे महत्त्व कळावे यासाठी तालुक्यातील नवेदर बेली येथील शाळेमध्ये मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. यानिमित्त शाळेच्या परिसरात रॅली काढण्यात आली. या रॅलीला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यातून मतदान करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी केले.



शालेय शिक्षणात व्यवहारज्ञानाचे धडे मिळणे हा एक शिक्षणाचा भाग आहे. लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले. यावेळी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व कळावे या उदात्त विचारातून व पालकांनीही मतदानास चांगला प्रतिसाद द्यावा याकरिता केंद्रप्रमुख संदीप वारगे यांच्या मार्गदर्शनाखाली राजिप शाळा नवेदर बेली शाळेच्या मुख्याध्यापिका दीपा फाळके आणि शिक्षक यांच्या माध्यमातून स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती अभियान रॅली काढण्यात आली.

मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून बाहेर फिरायला न जाता, घरी न थांबून मतदान करावे, अशी भावनिक साद रॅलीच्या माध्यामातून घालण्यात आली.

## विद्यालयातील मुलींची आरोग्य तपासणी

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील नांदगाव-यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील मुलींची नुकतीच आरोग्य तपासणी करण्यात आली.

आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जस्मीन मनसे, काशिनाथ कुलकर्णी, आरोग्य पथक नांदगावच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रेया पाटील, गणेश शिंदे, राजेंद्र चुनेकर, सुभाष हुरदुके, प्रणय धसाडे, प्रज्ञा चौलकर, साक्षी गुरव, स्नेहा वीरकर, सुमित वाडकर, मळेकर आदींनी मुलींची एच.बी. हिमोग्लोबीन व अन्य तपासण्या केल्या.

यावेळी मुलींनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे असून, व्यायामाचे महत्त्व, फास्ट फूडचे सेवन न करणे, पाळीच्या वेळी घ्यावयाची स्वच्छता व काळजी, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर करणे आदींबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

## मतदारांसाठी जनजागृती अभियान

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

तालुक्यातील वळके केंद्र नेहमीच गुणवत्तेत अग्रेसर असते. गटशिक्षण अधिकारी सुनील गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (दि.२२) सकाळी प्रत्येक गावात मतदार जनजागृती प्रभात फेरी काढण्यात आली.



'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो', 'वृद्ध असो की जवान, सर्वजण करा मतदान' आदी घोषणा विद्यार्थ्यांनी गावातील प्रभात फेरीत दिल्या. वळके केंद्रातील चोरढे मराठी, चोरडे उर्दू, तळेखार, सावरोली, वेताळवाडी, शिवगाव, ताडगाव, ताडवाडी, सातिर्डे, वळके, शिरगाव, आमली, संजय नगर चेहेर, वाघुळवाडी या शाळांनी मतदार जनजागृती अभियान राबवले. सर्व विद्यार्थ्यांनी प्रभात फेरीतून विविध घोषणा देत गावातील मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. रमेश भगत, राजेंद्र नाईक, संगीता भगत, राजाराम म्हात्रे, रुईकर, जगदीश चवरकर, देवानंद गोगर, हेमंत म्हात्रे, कल्याणी शिंदे, रेश्मा गुंडा आदी शिक्षकांनी या प्रभात फेरीचे नियोजन केले होते.

## साप्ताहिक राशिभविष्य दि. २४ ते ३० मार्च २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद

**मेष :** मेषराशीधारकांना आपले ग्रहमान पाहता आपणास राजकारण, क्रीडा क्षेत्रांत प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. हितशत्रूंवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. साहसी वृत्तीने वागणे टाळा. इतरांकडून मदतीची अपेक्षा न ठेवता स्वतःच्या कामात झोकून द्या. कलाक्षेत्राला उत्तम प्रतिसाद मिळेल. आपण सर्वांशी प्रेमाने वागल्यास हीच मंडळी आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकतिल. काही घरगुती प्रश्न सोडविताना भावनिक बाजू बाजूला ठेवा. कामात वाढ झाल्याने आपण व्यस्त राहाल तरीही जोडीदाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. हाती घेतलेली कामे पार पाडू शकाल. कलाकार मंडळीना कलाक्षेत्रात उत्तम प्रतिसाद मिळेल, आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचे धोरण अवलंबिल्यास पुष्कळशा गोष्टी सफल होऊ शकतात. व्यापारात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभदिनांक** - २४,२५

### खाण्यापिण्याची पथ्ये पाळा

**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता व्यापार-उद्योगात प्रगती करता येईल. साहसी कृत्ये करण्याचे टाळावीत नाहीतर संकटात पडू शकता, मुलांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपण कोणतेही निर्णय घेण्याआधी त्याचा साधक-बाधक विचार करूनच अवलंब करणे हितकारक ठरू शकेल. कुठलीही गोष्ट ताणून घेऊ नका. नको त्या प्रलोभनात अडकू नका. हितशत्रूंना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. प्रकृतीबाबत अधिक निर्बंध पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. व्यापाराला चालना मिळेल. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल, शेतीत लाभ होईल. आपल्या रागावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, जेणेकरून इतरांची नाराजी होणार नाही याकडे लक्ष द्या. कामात आपला स्वार्थ न बघता इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोन ठेवल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक-** २६,२७.

### कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल

**मिथुन :** मिथुनराशीसाठी आपले ग्रहमान पाहता आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगावी. गुंतवणूक करणे टाळावेत. राजकारणापासून दूर राहणे चांगले. कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या कामाचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. कोर्टदरबारच्या कामांना गती मिळेल. शेतीविषयक कामांना चालना मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. वैवाहिक जोडीदाराशी सामंजस्याने वागावे. प्रेमासंबंधी मंडळींना सबुरीचा सल्ला देण्यात येत आहे. संगणक व तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी यशाची अपेक्षा ठेवू शकतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक-** २४,२६

### गुरूकृपेचा लाभ मिळेल

**कर्क :** कर्कराशीधारकास या सप्ताहात आपण आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा आपण आपल्या नोकरी-व्यवसायात चैतन्य आणण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या आशा-आकांक्षा पुऱ्या होऊ शकतील. गुरूकृपेचा लाभ मिळू शकेल व घेतलेल्या कामात सफलता मिळेल. वरिष्ठांशी जुळवून घेण्यासाठी प्रयत्नशील राहा. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्‌भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आर्थिक बाजू ठीक राहील. उधारी घेऊ नका देऊ नका. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपण सत्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास व त्यानुसार कृती केल्यास आपला यशाचा मार्ग सुलभ होईल. कुटुंबातील आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आपण सकारात्मक दृष्टिकोनातून वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा आशा-अपेक्षा पुऱ्या होऊ शकतील. विद्यार्थीवर्गाने अध्ययनात परिश्रम वाढविल्यास अपेक्षित यश प्राप्त होऊ शकेल. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. **शुभ दिनांक** - २५,२७.

### प्रवासाचे योग संभवतात

**सिंह :** सिंहराशीसाठी वृश्चिकराशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. शेतीविषयक कामांना प्राधान्य द्याल. वकिलांना हा काळ उत्तम राहील. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहावे, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळावीत व पोटाच्या विकाराबाबत सावध राहावे. प्रवासाचे योग संभवतात. आपल्या कार्यक्षेत्रात व कौटुंबिक जीवनात येणाऱ्या प्रसंगांना स्थितप्रज्ञेने उत्तरे देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा चांगला जाईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. इतरांच्या बोलण्याने विचलित न होता त्यांना सामोरे जा. आपली शारीरिक प्रतिकारशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करा. नको त्या प्रलोभनात अडकू नका. सरकारी नियमांना प्राधान्य द्या व ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. आपण आपल्या कामावर एकाग्रता पाळून आपले नियोजित ध्येय गाठण्याचा प्रयत्न केल्यास यशाचा मार्ग सुकर होईल. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक-** २४,२८

### आठवड्याची सुरूवात चांगली राहील

**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहात सुरवातीला कानावर चांगली बातमी येईल मुलांचे प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः त्यांची खाण्याची पथ्ये सांभाळा व आपण कफ विकारांपासून सावध राहा. व्यापार-उद्योगाला चालना मिळेल. आपण सर्वांशी बोलताना शब्द जपून वापरल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येणे शक्य आहे. कलाकारांच्या कलागुणांना वाव मिळेल त्यांचा गोरव होण्याची शक्यता राहील. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. शेती व कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. घरगुती वातावरण चांगले राहील. सरकारी नियमांचे पालन करा. मुलांनी अध्ययनासाठी ज्येष्ठांच्या संपर्कात राहावे. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही. थोरामोठ्यांच्या भेटी होण्याची शक्यता राहील. कोणालाही पैसे उधार देऊ नका. जमीन राहू नका. कामावर आपले काम हलके करण्यासाठी योग्य व्यक्तीची कामासाठी निवड करा व आपली जबाबदारी कमी करा. **महिलांना-** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक-** २९,३०.

### कामांना गती मिळेल

**तुळ :** तुळराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत गोड बोलून आपले कार्य साध्य करण्याचे धोरण स्वीकारल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल, आपण प्रत्येक बाबतीत सामंजस्याने वागण्याचा प्रयत्न केल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. एखादी नेतृत्वाची संधी मिळण्याची शक्यता आहे पण बडेजाव मात्र टाळा. काही महत्त्वाच्या गोष्टींबाबत मौन पाळणे अधिक लाभदायक ठरू शकते. शेतीविषयक व कोर्टाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. आर्थिक व्यवहारात योग्य व्यक्तींचा सल्ला घ्या. हितशत्रूंवर नजर ठेवा. अचानक साहसी कृती आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. आपली बलस्थाने कोणती यांचा मागोवा घ्या व भावी आयुष्याचा विचार करून वागा. सरकारी नियमांचे पालन करणे हिताचे राहील. सामाजिक कामाला प्राधान्य द्या त्याचे पडसाद आपल्यासाठी फायद्याचे असतील. नेहमी आशावादी राहण्याचा प्रयत्न करा. **महिलांना-** नको त्या विचारात अडकू नका. तब्येत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक-** २७,३०

### प्रवासात सावधानता बाळगा

**वृश्चिक :** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नातलगात व मित्रमंडळींत उधार-उसनवारी टाळणे हितकारक राहू शकेल. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च होणार नाही याची दक्षता बाळगा. व्यापारात प्रगती होण्यासाठी प्रसारमाध्यमांचा उपयोग केल्यास उत्तम. मुलांना प्रगती करता येणे शक्य होईल. प्रवासात मात्र सावधानता बाळगा, किमती वस्तु सांभाळणे गरजेचे राहील. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा. आपल्या कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल आणि आपल्या ध्येयाजवळ जाता येणे शक्य होईल. व्यवसायाला चालना मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्ट, मित्रमंडळींच्या गाठीभेटीचे योग संभवतात. काही नवीन प्रस्ताव मिळतील, मुलांना अध्ययनात प्रगती करण्याची संधी मिळेल. जागेसंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, **शुभ दिनांक-** २४,२७

### नोकरदारांना दिलासा मिळेल

**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत संयमाने वागणे स्वीकारल्यास आपणास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत मात्र तज्ञांचा सल्ला घेऊनच व्यवहार करणे योग्य राहील. आप्तेष्ट, मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. मात्र आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कोणाशीही नाराजी पत्करू नका. मुलांकडे अधिक लक्ष दिल्यास उत्तम. त्यांच्या अध्ययनात आपले सहकार्य द्या. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा.अपेक्षित गोस्टी साध्य करता येईल. कामात उस्ताह राहील, गुरुची कृपा अनुभवण्यास मिळेल, मनातिल वाईट विचारांना दूर सारा. एकाग्रता वाढवण्यासाठी ध्यान करा **महिलांना-** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक-** २८,२९

### वादाचे प्रसंग टाळा

**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता नवीन नोकरी असणाऱ्याना वातावरण चांगले भेटणार आहे. कुटुंबात एखाद्या चांगल्या कार्याचा योग आखला जाईल. जास्त तेलकट पदार्थ खाऊ नका त्रास होऊ शकतो. घरून काम करतानाही वरिष्ठांशी मिळतेजुळते धोरण स्वीकारा. आपल्या कामाचे बक्षीस बढतीच्या रूपात आपल्याला मिळणार आहे, कलेत मन रमवाल, योगाचा अवलंब करा, कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल . व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. मन लागले नाही तरी अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे, अशा परिस्थितीत अभ्यासाविषयी आपली दृढ इच्छाशक्तीच मदतरूप ठरेल. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. **महिलांना-** ह्या महिन्यात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दहा दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक-** २६,०१

### मोठी गुंतवणूक टाळावी

**कुंभ :** कुंभराशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आरोग्याच्या बाबतीत जे मागील काही दिवसांपासून आजारी होते त्यांना काहीसा दिलासा मिळेल. ज्यांना एलर्जी, त्वचा विकार संबंधित समस्या असतील त्यांना उत्तरार्धात दिलासा मिळू शकेल. जिद्द व आत्मविश्वासाने नियोजित कामे पार पाडा. सध्या मोठी गुंतवणूक टाळावीत. आरोग्याबाबत हलगर्जीपणा करू नका, जिवलगाकडून भेटवस्तु मिळेल. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. आर्थिक बाजू ठीक राहील. घरातल्यांची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. घरात एखादे मंगल कार्य होणार आहे त्याची तयारी करावी लागेल. आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळणार आहे. **महिलांना-** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक-** २७,२८

### आरोग्याची काळजी घ्या

**मीन :** मीनराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता हे दिवस विद्यार्थ्यांसाठी चांगले असले तरी प्रवेश परीक्षा किंवा नेहमीच्या परिक्षां व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमात थोडी जास्त मेहनत करावी लागेल. नंतर आपणास अभ्यासात खूप मेहनत वाढवावी लागेल. तसेच आरोग्याची खूप काळजी घ्यावी लागेल, अन्यथा आजारपण बळावण्याची शक्यता आहे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या आपण एखाद्या अशा व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल कि जी आपल्याहून वयाने अधिक मोठी किंवा लहान असेल. विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड विचारपूर्वक करावी लागेल. **महिलांना-** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा **शुभ दिनांक-** २९,३०.

# कर्तृत्वाने ठसा उमटविणारे नेतृत्व



**प्रमोद जाधव**

राजकीय क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, अशा अनेक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर ठसा उमटवणारे, तरुण, उमदे नेतृत्व, तरुणांचे प्रेरणास्थान, स्पष्टवक्ता ॲड. आस्वाद पाटील यांचा आज वाढदिवस. वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे सुपुत्र असलेले ॲड. आस्वाद पाटील यांनी चाणाक्षबुद्धीने राजकारणात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील यांच्या पावलावर पाऊल ठेवत राजकारणात खंबीरपणे काम केले आहे. जिल्हा परिषद सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत धुरा सक्षमपणे सांभाळत ग्रामीण भागातील विकासाला गती देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. प्रशासनाचा गाढा अभ्यास असणारे ॲड. आस्वाद पाटील यांनी राजकारणासह समाजकारण, व क्रीडा क्षेत्रातील प्रत्येक घटकाला सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला आहे. रायगड जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती तसेच उपाध्यक्ष, अध्यक्ष अशी अनेक पदे सांभाळत असताना त्यांनी प्रशासकीय कामकाजात शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आहे.

शांत आणि धोरणीवृत्तीने विरोधकांना नामोहरम करण्याची ताकद आस्वाद पाटील यांच्याकडे आहे. त्यामुळे रायगडच्या राजकारणात तरुण पिढीसाठी ते कायमच 'आयडॉल' ठरले आहेत. सामाजिक बांधिलकी जपून काम करण्याची भूमिका त्यांची नेहमीच राहिली आहे. गरजूंना मदत करणे, गोरगरीबांना उभारी देणे, खेळाडूंना बळकट करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम आस्वाद पाटील यांनी केले आहे. त्यामुळे राजकारणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील एक कर्तृत्ववान व्यक्ती म्हणून त्यांची ख्याती आहे.

जिल्हा चिटणीसपदाची जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे सांभाळली आहे. तालुका, जिल्हास्तरावर बैठका घेऊन पक्षवाढीसाठी त्यांचा पुढाकार कायमच राहिला आहे. युवा पिढीला प्रोत्साहित करण्यात त्यांचा विशेष प्रयत्न राहिला आहे. एखादे काम हाती घेतल्यावर ते पूर्णत्वास नेण्यामध्ये त्यांचा एक वेगळा हातखंडा आहे. कोणतेही काम करताना, त्याचा अभ्यास करणे, त्यातून होणाऱ्या परिणामांचा विचार करून निर्णय घेण्यामध्ये त्यांचा कटाक्ष राहिला आहे.

गोरगरीबांचा विकास साधण्याबरोबरच त्यांच्यापर्यंत शासनाच्या योजना पोहोचाव्यात या ध्येयातून आदिवासी वाडी-वस्त्यांमध्ये मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याचे काम त्यांनी केले आहे. शाळेतील मुलांचे आरोग्य चांगले राहावे, मुला-मुलींच्या शिक्षणाचा दर्जा उंचवावा, जिल्ह्यात पर्यटनवाढीला अधिक चालना देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

पनवेल महानगरपालिकेची निर्मिती झाल्यावर जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात घट होण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, आपल्या बुद्धिकौशल्याच्या जोरावर आपल्या मालकीच्या जागा ताब्यात घेऊन त्याठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करून जिल्हा परिषदेचे उत्पन्न कसे वाढेल याकडे त्यांनी लक्ष दिले.

ॲड. आस्वाद पाटील यांना क्रीडा क्षेत्राबद्दल अपार प्रेम आहे. गावे, वाड्यांमधील खेळाडू घडला पाहिजे, त्यांना खेळातून हक्काचे व्यासपीठ मिळाले पाहिजे, या भावनेतून त्यांनी कबड्डी खेळाची परंपरा अबाधित राखण्याचा प्रयत्न कायमच केला आहे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनची धुरा यशस्वीपणे सांभाळताना त्यांनी स्थानिक खेळाडूंना राज्य, देश पातळीवरील व्यासपीठ मिळावे यासाठी काम करण्यास सुरूवात केली. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन संघटनेचे सरकार्यवाह पद हाती घेतल्यावर कबड्डी खेळाला एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम त्यांनी केले आहे. प्रो-कबड्डीच्या धर्तीवर अलिबागमध्ये कबड्डी स्पर्धा भरवून कबड्डीपटूंना सक्षम बनविण्यामध्ये त्यांचा पुढाकार राहिला आहे. ॲड. आस्वाद पाटील यांना वाढदिवसानिमित्त खूप खूप शुभेच्छा! ●●


## जल दिनानिमित्त मार्गदर्शन

**। माणगाव । वार्ताहर ।**

पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी सीएसआर सामाजिक विनियोगाच्या अनुषंगाने माणगाव येथील कंपनीच्या प्लॅटमध्ये शुक्रवारी (दि.२२) डॉ. राहुल मुनगीकर यांचे पर्यावरण आणि जैवविविधता या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेत पर्यावरण प्रदूषण, पर्यावरण व जैवविविधता यांचे महत्त्व ,जागतिक तापमानवाढ, जंगलतोड, वनवे, पर्यावरणाची हानी इत्यादी विषयांवर डॉ. राहुल मुनगीकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कंपनी व्यवस्थापक महेंद्र थिटे, कुलदीप पुरंदरे, सागर पाटील उपस्थित होते.

## होळी सणानिमित्त नोकरदार गावाकडे

### महामार्गावर वाहतूक कोंडी



**। माणगाव । वार्ताहर ।**

शिमगोत्सवानिमित्त मुंबई, पुण्यातील नोकरदार आपापल्या गावाकडे उत्सवाचा आनंद घेण्यासाठी निघाले असल्याने मुंबई गोवा महामार्गावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. तालुक्यातील माणगाव, इंदापूर आदी महत्त्वाच्या शहरातील नाक्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाल्याने शनिवारी (दि.२३) वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

महामार्गावर शहरांच्या दोन्ही बाजूस दोन ते तीन किलोमीटर लांब वाहनांची रांग लागल्याचे दिसत होते. माणगाव बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होती. माणगावपासून खरवली फाट्यापर्यंत तीन किलोमीटर लांबीच्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. तीन किलोमीटर अंतरासाठी प्रवाशांना पंचवीस ते तीस मिनिटांचा कालावधी लागत होता. महामार्गावर बाजारपेठांच्या नाक्यावरील शहरांमध्ये वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात झाली होती.

## हिरवळ महाविद्यालयाच्या शिक्षकांचा गुणगौरव


**माणगाव** : रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट, महाड या सामाजिक संस्थेने कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान सोहळा शनिवारी (दि. २३) आयोजित केला होता. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यामध्ये हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स महाडचे प्राचार्य सुदेश कदम यांना उत्कृष्ट प्रशासक व व्यवस्थापक, प्राध्यापिका आरती नाडकर यांना उत्कृष्ट सांस्कृतिक व्यवस्थापक म्हणून सन्माचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ रायगड फॉर्ट महाडच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू फडके, सूर्यकांत महाडिक, सपना शेठ, मनीषा नगरकर, समीर गाडगीळ, प्रदीप शेठ उपस्थित होते.












# मतदार संघातील सन्मान कार्यकर्त्यांकडून

## संजोग-वाघेरे पाटील यांचे प्रतिपादन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत, खालापूर तालुक्यातील शिवसैनिक कट्टर आणि निष्ठावंत असल्याचा अनुभव मागील तीन महिन्यापासून येत आहे. या भागातील कार्यकर्त्यांकडून मोठा सन्मान मिळत असून, आपण मावळमध्ये फिरत आहोत असा अनुभव मिळत असल्याने इंडिया आघाडीची महविकास आघाडीची ताकद वाढत आहे असा विश्वास मावळ लोकसभा मतदारसंघाचे इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग-वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी सर्व तालुका पदाधिकाऱ्यांची वाघेरे पाटील यांच्याशी ओळख करून देण्यात आली.




यावेळी कार्यक्रमात कर्जत शहरातील भारतीय जनता पक्षाचे उपशहर अध्यक्ष कृष्णा जाधव यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. तसेच युवासेनेचे पदाधिकारी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. वाघेरे- पाटील यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना मावळ लोकसभा मतदारसंघातील सर्व सहा विधानसभा मतदारसंघात संघटनेची जबाबदारी उद्धव ठाकरे यांनी दिली असल्याचे त्यांनी सांगितले. पक्ष फुटीनंतर नितीन सावंत यांनी उपजिल्हा प्रमुख म्हणून प्रत्येक गावात शिवसैनिकांना बळ देण्याचे काम केले आहे. त्यामुळे कट्टर शिवसैनिकांचा हा मतदारसंघ असल्याने मला देखील या ठिकाणी बरेच शिकण्यासाखरे आहे. त्यामुळे घाटावरील मावळ आणि पिंपरी चिंचवड भागात प्रेम मिळते तसे प्रेम कर्जत आणि खालापूर मतदारसंघातील जनता दिसून येत असल्याने मी धन्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

मी या ठिकाणी नवखा असलो तरी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रीय काँगेस तसेच आप आणि अन्य सर्व पक्ष यांच्याकडून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, कर्जत तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, खालापूर तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, जिल्हा महिला संघटक सुवर्णा जोशी, महिला तालुका संघटक करुणा बडेकर, कर्जत तालुका संघटक बाबू घारे, तालुका संघटक सुमन लोंगले, आवेश जुवारी, सुरेश गोमारे, प्रमोद सुर्वे, प्रदीप ठाकरे, पंढरी राऊत, प्रथमेश मोरे, संपत हडप, नितीन धुळे, माधव कोळंबे आदी उपस्थित होते.

# उरणमध्ये पोलीस दलाचे संचलन

। उरण । वार्ताहर ।

आगामी लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील परिमंडळ २ अंतर्गत असलेल्या उरण तालुक्यात कायद्या व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच समाजकंटकावर, गुन्हेगारांवर वचक राहून निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पाडाव्यात याकरीता पोलीस दला मार्फत उरण शहरात तसेच तालुक्यात विविध ठिकाणीपोलीस संचलन करण्यात आले.



जासई पोलीस चौकी येथून जासई गावा, दि. बा. पाटील मंगल कार्यालय, उरण एसटी स्टँड चार फाटा, उरण कोर्ट, हनुमान कोळीवाडापर्यत पोलीस दलाने संचलन केले. या पोलीस दलाचे संचलनामध्ये उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश निकम, सूर्यकांत कांबळे, ०८ एपीआय /पीएसआय, ३० पोलीस अंमलदार, मोरा सागरी पोलीस ठाण्याचे सुनील शिंदे, ०१ एपीआय, ११ पोलीस अंमलदार यांच्यासह आरपीएफचे ३ अधिकारी,३० अंमलदार असे शस्त्रे, लाठी, हेल्मेट व वाहनांसह सहभागी झाले होते.

# मोहोपाडा बाजारपेठ होळीनिमित्त सजली

## आकर्षक पिचकाऱ्यांसह साखरमाळांनाही पसंती

। रसायनी । वार्ताहर ।

होळीचा सण काही तासांवर आल्याने मोहोपाडा बाजारपेठ सजली आहे. यंदा लहानगे गॉगल पिचकाऱ्या, विविध प्रकारचे रंग, टी शर्ट्सने बाजारपेठ सजली आहे. तर, मुखवट्यांमध्ये पक्षी, प्राणी, कॉमिक्समधील हिरो, कार्टुनमधील पात्रांचे मुखवटे खरेदी करण्याकडे नागरिकांचा अधिक कल आहे.




क्रिश चित्रपटातील गॉगल पिचकारीला लहान मुले, तरुणांची चांगलीच पसंती मिळत आहे. पारंपरिक पिचकाऱ्यांसह पंपाद्वारे पाणी सोडणाऱ्या विविध रंगी लहान-मोठ्या आकाराच्या ५० ते हजार रुपयांपर्यंतच्या पिचकाऱ्या मोहोपाडा बाजारात दिसत आहेत.रासायनिक रंगासह मोहोपाडा बाजारपेठेत विविध प्रकारचे नैसर्गिक रंग, स्प्रे यांना ग्राहकांकडून मागणी आहे. तसेच मोहोपाडा बाजारपेठेतील विनायक डुकरे यांनी होळीनिमित्त साखरमाळा बाजारात विक्रीसाठी ठेवल्या आहेत. होळीमातेला तसेच शिमग्यात लहान मुलांच्या गळ्यात साखरमाळ घालण्याची पूर्वापार चालत आलेली परंपरा असल्याने बाजारपेठेत साखरमाळ मोठ्या प्रमाणात दिसत आहेत.

# बळी सेना, कुणबी एकीकरण समिती लोकसभेच्या रिंगणात

## राज्यभरात अकरा जागा लढविणार असल्याची घोषणा

। माणगाव । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीचे बिगुल नुकतेच वाजले आहे. देशात सात टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यातील ११ जागा बळी सेना व कुणबी एकीकरण समिती-महाराष्ट्र राज्य माध्यमातून लढविणार असल्याचे पक्षाध्यक्ष अशोक वालम यांनी गुरुवार, दि. २१ मार्च रोजी मुंबई येथे पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले. या बैठकीला ज्येष्ठ नेते कृष्णा कोबनाक व अन्य मान्यवर उपस्थित होते.




रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, मावळ, सांगली, नाशिक, उत्तर मध्य मुंबई, उत्तर मुंबई, ठाणे, भिवंडी, पालघर, अशा एकूण ११ लोकसभेच्या जागांवर उमेदवार देणार असल्याचे सांगितले. त्यापैकी संघाध्यक्ष भूषण बरे- रायगड, राजाराम पाटील- मावळ, गणेश डांगे- सांगली, धनंजय किनगावकर- नाशिक व श्रावण बाळा इंगळे- उत्तर मध्य मुंबई यांची नावे जाहीर करण्यात आली आहेत.

# साळीवाडा येथे शहीददिन साजरा

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड जुनी पेठ साळीवाडा येथील मोहन गजानन करंदेकर यांच्या निवासस्थानी क्रांतीवीर भगतसिंग राजगुरू व सुखदेव यांच्या ९३ वा स्मृतीदिन साजरा करण्यात आला.

यावेळी क्रांतीवीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्यासह मंगल पाण्डे, मादाम कामा, चंद्रशेखर, सुभाषचंद्र बोस, वासुदेव बळवंत फडके ,भाई कोतवाल, चाफेकर, लोकमान्य टिळक, मदनलाल धिग्रां व भारतमातेच्या प्रतिमाचे पूजन करुन क्रांतीवीराना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी मोहन करंदेकर, चंद्रकांत शहासणे, स्नेहा पाटील, मंगेश दांडेकर, श्रीकांत सुर्वे, वासंती उम रोटकर, नगेन सिंग, अजित कारभारी, गिरीश साळी, महेश भगत, स्वप्निल कवळे, ऋषी पोतदार, रुपेश भाटकर, मानसी करंदेकर, राजेश गुप्ते शालेय विद्यार्थी व असंख्य मान्यवर भेट देऊन वीर हुतात्म्यांना मानवंदना देण्यात आली.

# उरुस कमिटीची कार्यकारिणी जाहीर




। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्यातील उरुसमध्ये जिल्ह्यातील नागरिक विविध प्रकारच्या वस्तू खरेदीसाठी येत असतात. शहरातील मुख्य मार्गावरील हजरत मिरा मोहिद्दिन सरकार चौकातील शाह हजरत मिरा मोहिद्दीन बाबा दर्ग्याच्या परिसरात साजरा करण्यात येतो. उरुस उत्सवासाठी स्थापन करण्यात कमिटीमध्ये सादिक इलामी यांची अध्यक्षपदी, झिशान सय्यद यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. जोहेब कुरेशी यांची सचिवपदी, जुबेर पानसरे यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली आहे.

याचबरोबर नागोठणे उरुस कमिटीमध्ये गुलझार शिंदी, अखलाक पानसरे, याकूब सय्यद, इक्बाल शिंदी, काझीम पानसरे, हुसेन पठाण, समीर भिकन, अमीन मांडलेकर, सुहेल पानसरे, अशपाक पानसरे,असिफ मुल्ला, मुझफ्फार कडवेकर, फैय्याज पानसरे, पप्पू अधिकारी, इक्बाल पानसरे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

# हाफीजाबानो पठाण यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्याजवळील गोडसई येथील रहिवासी हाफीजाबानो रहीम पठाण यांचे नुकतेच वयाच्या ९० व्या वर्षी वयोवृध्दत्वामुळे निधन झाले.



दिवंगत हाफीजाबानो पठाण यांच्या पार्थिवावर कोलाड येथील सय्यद व पठाण कुटुंबियांच्या दफनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी हिंदू-मुस्लिम बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. यांच्या पश्चात चार मुलगे, चार मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे, असे त्याच्या नातेवाईकांनी सांगितले.

# म्हसळ्यात मतदान जनजागृती रॅली

। आंबेत । वार्ताहर ।

३२ रायगड लोकसभा मतदार संघासाठी निवडणुकीची घोषणा तिसऱ्या टप्प्यात होणार आहे. या निवडणुकीत मतदान टक्का वाढविण्यासाठी मतदान जनजागृती कार्यक्रम हाती घेतला. यामध्ये अनेक उपक्रम राबविले जात आहेत. शुक्रवारी (दि.२३) १९२ श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील म्हसळा शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. किसन जावळे प्रांताधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली काढण्यात आली. यावेळी तहसीलदार समीर घारे, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, मंडळ अधिकारी सलीम शहा यांसह अन्य अधिकारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.




# मांडला मराठी शाळेमुळेच मी घडलो : रोहेकर

। कोर्लई । वार्ताहर।

मुरुड तालुक्यातील मांडला येथील रायगड जिल्हा परिषदेच्या मांडला मराठी शाळेमुळेच मी घडलो, असे उद्गार माजी विद्यार्थी तथा पनवेल येथील नर्सरी व्यावसायिक दिलीप रोहेकर यांनी शाळेचे ऋण व्यक्त करताना काढले. शाळेतील व अंगणवाडीतील मुलांना शालेय साहित्य वाटपप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी मांडला शाळेतील सर्व विद्यार्थी आणि अंगणवाडीतील मुलांसाठी वही, पेन, पेन्सिल हे शैक्षणिक साहित्य, सरस्वतीची मूर्ती, मार्बल्सचे पूजाघर, नकाशा सुशोभीकरणासह थोर पुरुषांच्या आकर्षक फोटोफ्रेम आदी भेटवस्तू त्यांनी दिल्या. दिलीप रोहेकर यांनी यावेळी प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत सरपंच ऋतिक नागोटणेकर, मुख्याध्यापक समीक्षा नांदगावकर, देणगीदार माजी विद्यार्थी दिलीप लक्ष्मण रोहेकर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अपर्णा नागावकर, शिक्षणतज्ज्ञ सुरेश नांदगावकर, पदवीधर शिक्षक महेश कवळे, रमाकांत ठाकूर, अस्मिता भगत, निकिता रोहेकर, प्रदीप जाधव, विलास ठाकूर, मधुरा पालवणकर आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना व्यसनाधिनतेवर मार्गदर्शन

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी पाताळगंगा वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज कनिष्ठ महाविद्यालय येथे संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशनच्यावतीने शनिवारी (दि.२३) इयत्ता ११वीच्या विद्यार्थ्यांसाठी किशोरावस्था आणि व्यसनाधीनता या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाला ६८ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



संवेदना डेव्हलपमेंट फाऊंडेशनच्या मोहिनी बागडे यांनी मुलांना वयात येताना होणाऱ्या शारीरिक, मानसिक बदलांविषयी माहिती दिली. आजकाल तरुण पिढीमध्ये वाढत चाललेल्या व्यसनांसंबंधीत चर्चा केली. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थ आपल्या आरोग्यासाठी किती घातक आहेत आणि ते आपल्या आरोग्यावर किती वाईट परिणाम करतात हे सांगून आपण स्वतःला या व्यसनांपासून कसे दूर ठेवू शकतो, याबद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी वर्गाचा उत्तम प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम होण्यासाठी पारनेरकर महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य ई. के. सोनावणे सर आणि प्राध्यापक अनिल पाटील सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आजी आजोबा दिवस साजरा

। उरण । वार्ताहर ।

गो. ना. अक्षीकर विद्या संकुलातील जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट इंग्लिश मीडियम स्कूल उरण प्री प्रायमरी आणि प्रायमरी यांच्यातर्फे शाळेमध्ये आजी आजोबा दिवस साजरा करण्यात आला.



सध्याची कौटुंबिक परिस्थिती पाहता आई-वडील नोकरी अथवा व्यवसायानिमित्त घराबाहेर जास्त वेळ असल्याने पाल्यांची संपूर्ण जबाबदारी आजी-आजोबांवर असते. शाळा सोडून घरातला जास्त वेळ ते आजी-आजोबांसोबत घालवतात. खरंतर आजी-आजोबा आणि नात किंवा नातू यांचं नातं फार विलक्षण असतं, खास असतं. आजी-आजोबा हे नातवंडांची पहिले मित्र असतात. नात्याची तेव्हा तिथूनच खरी जडण-घडण होत असते. म्हणून आजी-आजोबांचे नातवांशी असलेल्या घट्ट नात्याची ओळख होणे आजच्या काळात महत्त्वपूर्ण असून हे नातं मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी गरजेचं आणि प्रेरणादायी आहे.

शाळेतील अनुभवासह आजी-आजोबांचे अनुभव, त्यांच्या हितगुजातून मिळणारी माहिती या गोष्टी पाल्याच्या जडणघडणीसाठी पोषक ठरतात म्हणून आजी आजोबा दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी जगदीश श्रीधर चव्हाण, शाळेचे स्कूल कमिटी चेअरमन सदानंद गायकवाड, वैशाली पाटील, लक्ष्मण भोये, सानिका फराड, नीला उपाध्ये, सुनंदा कुमार, दिपाली पाटील, जयश्री पाटील, माजी मुख्याध्यापक,शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

# करा साजरी होळी, दान करा पुरणपोळी

## संकल्प शैक्षणिक सामाजिक संस्थेचे आवाहन

। पनवेल । वार्ताहर ।

**पुरणपोळी दान परंपरा**

**कुंडे वहाळ गावातील देवदूत ग्रुपच्या माध्यमातून संकल्प संस्थेच्या सहकार्याने होळीच्या सणानिमित्त पुरणपोळी त्याचबरोबर इतर पदार्थ प्रत्येक घरातून दान करण्याची परंपरा गेल्या काही वर्षांपासून सुरू करण्यात आले आहे. या पोळ्या गोरगरीब आणि झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना वाटप केल्या जातात. त्यांनाही गोडधोड देऊन सामाजिक बांधिलकी जपली जाते.**

होळीला पुरणाच्या पोळ्या करण्याची परंपरा आहे. घरात गोड धोड केले जाते. होळीत दृष्ट प्रवृत्तीचा नाश व्हावा अशी त्यामागची कल्पना असते. याच भावनेने होळीत पुरणपोळी अर्पण केली जाते. हे अन्न जळून खाक होण्याऐवजी ते गरीब आणि अर्धपोटी झोपणाऱ्यांच्या मुखात जावे या उद्देशाने संकल्प शैक्षणिक सामाजिक संस्था गेल्या काही वर्षांपासून काम करत आहे. यंदाही होळीनिमित्त पुरणपोळी दान करण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचे संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी सांगितले.

दृष्ट प्रवृत्ती, वाईट, अमंगल विचार यांचा नाश करुन चांगली वृत्ती, चांगले विचार अंगी बाळगावे, हा या होळीच्या सणामागील उद्देश आहे, होळीनिमित्त पुरळपोळी, रंग, धुडवड या सगळ्याचे आकर्षण असते.

पनवेल परिसरामध्ये हा होळीकोत्सव ठीक ठिकाणी साजरा केला जातो. या सणानिमित्त गरिबांचे तोंड सुद्धा गोड व्हावे या उद्देशाने होळीत पोळी न टाकता त्या जमा करण्यात येतात.




यासाठी संकल्प शैक्षणिक व सामाजिक संस्थेने ही गेल्या काही वर्षांपासून पुढाकार घेतला आहे. यंदाही होळीनिमित्त पुरणपोळी दान हा संकल्प या संस्थेने केला आहे. त्यानुसार संस्थापिका वैशाली जगदाळे यांनी पनवेल सह करंजाडे व इतर परिसरातील नागरिकांना २४ मार्चरोजी पुरणपोळी दान करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.

# दुर्गुणांची आहूती देऊन होळी साजरी करा

## आधुनिक युगात बदल घडवणे काळाची गरज

। तळा । वार्ताहर ।

हिंदु धर्मात हुताशनी पौर्णिमा म्हणजेच होळीपौर्णिमा वर्षातील शेवटचा सण या सणालाअंत्यत महत्त्व आहे. आपल्या जीवनात भौतिक सुखाच्या मागे लागून अपप्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालल्या असून विशेषतः तरूण पिढींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढीस लागला आहे, त्यामुळे धर्मसंस्कार संस्कृती लोप पावली जात आहे. वाईट अपप्रवृत्तीचा नाश या हुताशनी पौर्णिमेला होळीत विसर्जन करणे असे आध्यात्म व पुराणात सांगितले आहे.



आजच्या समाजाला खरी गरज आहे. मोठ्या होळीला मोठ मोठी झाडे तोडून होळीत जाळली जातात त्यामुळे जंगल संपत्तीचा ऱ्हास होत आहे. निसर्गाची ही मोठी हानी होते याची जाणीव नाही. सरकार वृक्ष लागवड व संगोपन करण्यासाठी मोठे उपक्रम राबवून लागवड केली जाते. यामध्ये सामाजिक संस्था, शाळा कॉलेजमधून जनजागृती केली जाते. पर्यावरणच्या दुष्टिनेविचार करीत नाही याचा समाज जीवनावर मोठा विपरीत परिणाम होत आहे. दुर्गुणाची आहूती म्हणजे मनात साठलेला मळकाम, क्रोध, लोभ, मोह, मत्सररूपी दुर्गुण होळीत व धुलीवंदनात आकाशात भिरकावून देऊन जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण आहे. परंतु, या रंगपंचमीचे बाजारीकरण झालेले जिकडे तिकडे पहायला मिळते. नैसर्गिक रंगाची ऊधळण थांबली आहे.




























कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)